**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.48612, FEB-MAR 2018, VOL- 6/26*

# भावी शिक्षकांमधील जीवनकौशल्ये विषयक जाणीवजागृतीकरिता कार्यक्रमनिर्मिती व त्याची परिणामकारकता - एक अभ्यास

**श्री. ननवरे किरण वि.**

*सहायक प्राध्यापक , अभिनव शिक्षणशास्त्र महाविद्यालय, आंबेगाव बु।, पुणे 46.*

**Abstract**

*शालेय अभ्यासक्रमात नवीन संकल्पनांचा समावेश झाला की, त्याबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व शिक्षक प्रशिक्षण विभागाकडून त्याविषयी प्रशिक्षण सुरू होते. जीवनकौशल्ये या संकल्पनेबाबतही देशात सर्वप्रथम महाराष्ट्र राज्यात शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला. मात्र नवसमावेशित संकल्पनांबद्दल सेवापूर्व शिक्षक प्रशिक्षण देणा-या संस्थांना या संकल्पनांबाबत कोणत्याही प्रकारची माहिती नसते. किंबहुना शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचा त्या विषयी अध्यापकीय दृष्टिकोन विकसित होत नाही. जीवनकौशल्ये ही त्यापैकीच एक संकल्पना होय. जीवनकौशल्ये या संकल्पनेची सखोल माहिती प्रशिक्षणार्थ्यांना व्हावी म्हणून संशोधकाने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. प्रस्तूत संशोधनासाठी संशोधकाने प्रायोगिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी एकलगट अभिकल्पाची निवड करून जीवनकौशल्ये संकल्पनेच्या जाणीवजागृतीसाठी तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रमाची निर्मिती केली आहे. पूर्व व उत्तर चाचणी आधारे शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या संपादनातील फरकाचा अभ्यास करून निष्कर्षांची मांडणी केली आहे.*

**मुख्य संकल्पना :** *भावी शिक्षक , जीवनकौशल्ये, शालेय अध्यापन , व तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रमाची परिणामकारकता.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

जागतिकीकरणामुळे जग एक खेडे ही संकल्पना अस्तित्वात आली आहे. जसे त्याचे सकारात्मक परिणाम तसेच त्याचे नकारात्मक परिणाम देखील जाणवत आहेत. जीवनशैलीत आधुनिकीकरणामुळे प्रचंड वेग आला आहे. नवे शोध, नव्या गरजा, तंत्रज्ञानातील बदल, संगणकीकरण, खाजगीकरण,स्पर्धात्मकता, औद्योगीकरण, उदारीकरण यांचा प्रत्यक्ष परिणाम प्रत्येकावर होउ लागला आहे. समाज जीवनात मोठे बदल घडत आहेत. यामध्ये शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. कारण भावी पिढीला या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून घडविण्याचे काम शिक्षण करते. यासाठीच नवीन अभ्यासक्रमात मूल्ये , गाभाघटक यांच्या जोडीला जीवनकौशल्ये शिक्षण या संकल्पनेचा समावेश केलेला दिसतो.

**शीर्षक :**

भावी शिक्षकांच्या जीवनकौशल्यविषयक जाणीवजागृतीसाठी कार्यक्रमनिर्मिती व त्याची परिणामकारकता - एक अभ्यास.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**समस्या विधान :**

''सन 2011-12 या शैक्षणिक वर्षात अभिनव शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पध्दती असणा-या शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या जीवन कौशल्यांच्या संकल्पनात्मक जाणीवजागृतीसाठी तंत्रज्ञानाधारित कार्यक्रमाची निर्मिती व त्याआधरीत अध्यापनाची परिणामकारकता तपासणे.''

पारिभाषिक शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या

**1. भावी शिक्षक :**

सन 2011-12 या शैक्षणिक वर्षासाठी अभिनव शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले मराठी माध्यमाचे प्रशिक्षणार्थी.

**2. जीवनकौशल्ये : संकल्पनात्मक व्याख्या**

''जीवनकौशल्ये म्हणजे दैनंदिन जीवनात निर्माण होणा-या विविध गरजांना व समस्यांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी व्यक्तिने स्वतःच्या वर्तनात स्विकारात्मक व सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी च्या क्षमता म्हणजे जीवनकौशल्ये होय.''

***- जागतिक आरोग्य संघटना - 1997***

जागतिक आरोग्य संघटनेने 1997 साली जागतिक आरोग्य परिषदेच्या अहवालामध्ये शिफारस केलेली व महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ - बालभारतीने शालेय पाठयपुस्तकांमध्ये दिलेली दहा जीवनकौशल्ये होय. ती पुढीलप्रमाणे :-

स्वः ची जाणीव, समानानुभूती, समस्या निराकरण, निर्णयक्षमता, सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, व्यक्ति-व्यक्तिमधील निकोप सहसंबंध, परिणामकारक संप्रेषण, ताण-तणावांचे समायोजन, भाव-भावनांचे समायोजन.

**3. तंत्रज्ञानाधारित कार्यक्रम**

भावी शिक्षकांच्या जीवनकौशल्ये विषयक जाणीवजागृतीसाठी एकूण दहा जीवनकौशल्यांचा समावेश असलेला संगणकाधारित - पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनवर ॲनिमेशन , विविध चित्रे, फोटोज, आकृत्या, कोडी तसेच दैनंदिन जीवनावर आधारित प्रसंगांचा समावेश असलेला कार्यक्रम होय.

**4. परिणामकारकतेचा अभ्यास**

बी. एड. मराठी माध्यमाच्या सन 2011-12 च्या शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या जीवनकौशल्यविषयक जाणीवजागृतीपर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीनंतर त्याच्या संपादनामध्ये झालेला बदल पूर्व संपादन व उत्तर संपादन चाचणीतील गुणांच्या मध्यमानातील फरकाच्या सार्थकतेआधारे तपासून निष्कर्ष काढणे.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**संशोधनाची गरज**

शासनामार्फत वेळोवेळी सेवांतर्गत शिक्षकांना जसे गाभाभूत घटक , मूल्ये, अध्यापन पध्दती, मूल्यमापन पध्दती यांबाबत प्रशिक्षण दिले जाते. तसेच प्रशिक्षण जीवनकौशल्यांच्या बाबतीत व्यापक प्रमाणावर देणे गरजेचे आहे. तरच भावी पिढीला आपण ''जागतिक मानव'' बनवू शकू. तसेच सेवाअंतर्गत प्रशिक्षणाच्याही आधी जिथे शिक्षक-प्रशिक्षण दिले जाते त्या अध्यापक विद्या-महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात या नवीन संकल्पनांचा समावेश योग्य त्या वेळी व तातडीने होणे गरजेचे आहे. मात्र तो तेवढया तत्परतेने होताना दिसून येत नाही. हीच गरज ओळखून आपल्या अध्यापकीय पेशाबाबत जागरूक राहून संशोधकाने बी. एड. अभ्यासक्रमात समाविष्ट नसलेल्या मात्र भावी काळात सेवांतर्गत अध्यापकीय जीवनात  सर्वप्रथम सामोरे जाव्या लागणा-या ''जीवनकौशल्ये'' या संकल्पनेच्या जाणीवजागृतीपर संशोधन विषयाची निवड केलेली आहे.

स्ंशोधक हा शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी शिक्षण - अध्यापन पध्दतीचा मार्गदर्शक व अध्यापक आहे. विविध शाळातील विद्यार्थ्यांच्या सराव पाठ निरीक्षणादरम्यान असे दिसून येते की, आशय अध्यापनावेळी जीवनकौशल्यांवर भर देण्याबाबत विचारच केला जात नाही. आशयाच्या माध्यमातून गाभाभूत घटक व मूल्यांबरोबरच जीवनकौशल्यविषयक अध्यापकीय दृष्टीकोनातून अध्यापन करावे अशी अपेक्षा संपूर्ण शिक्षणप्रक्रियेकडून आहे. व हाच विचार बाजूला ठेवून अध्यापन प्रक्रिया चालू असते. असे होउ नये व जीवनकौशल्यांच्या रूजवणूकीसाठी अध्यापन व्हावे या गरजेपोटी या विषयाची निवड संशोधकाने केली आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

- **प्रशिक्षणार्थ्यांच्या दृष्टिने**

**प्रशिक्षणार्थ्यांना जीवनकौशल्ये ही संकल्पना ,तिचे स्वरूप व त्याविषयी अध्यापकीय दृष्टिकोन निर्माण होईल.**

1. प्रशिक्षणार्थ्यांना स्वः ची जाणीव, समानानुभूती, समस्या निराकरण, निर्णयक्षमता, सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, व्यक्ति-व्यक्तिमधील निकोप सहसंबंध, परिणामकारक संप्रेषण, ताण-तणावांचे समायोजन, भाव-भावनांचे समायोजन या जीवनकौशल्यांविषयी सखोल व सविस्तर माहिती होईल.
2. प्रशिक्षणार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित कार्यक्रमाद्वारे अध्यापन केल्याने नवसंकल्पनेविषयीची माहिती व अध्यापकीय दृष्टिकोन आताच विकसित होईल.

**संशोधनाची उदिदष्टे**

1. बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या जीवनकौशल्यविषयक जाणीवजागृतीचा अभ्यास करणे
2. बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या जीवनकौशल्यविषयक जाणीवजागृतीसाठी तंत्रज्ञानाधारित कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.
3. तंत्रज्ञानाधारित जीवनकौशल्यविषयक कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

**संशोधनाची गृहीतके**

1. शालेय अभ्यासक्रमात जीवनकौशल्यांचा समावेश केलेला आहे.
2. जीवनकौशल्य विषयक जाणीवजागृती व रूजवणूकीकरिता विविध कार्यक्रमाद्वारे प्रभावी अध्यापन करता येते.
3. जीवनकौशल्यांतर्गत येणा-या संकल्पना प्रशिक्षणार्थ्यांना भावी अध्यापकीय जीवनात दीर्घकालासाठी उपयोगी पडतात.
4. बहुतांश वेळा अध्यापन पारंपरिक पध्दतीनेच केले जाते. त्याऐवजी तंत्रज्ञानाधारीत अध्यापन प्रभावी होते.

**संशोधनाची परिकल्पना**

- **शून्य परिकल्पना**

जीवनकौशल्यांच्या संकल्पनात्मक जाणीवजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या तंत्रज्ञानाधारित कार्यक्रमाच्या अंमलबजावणीनंतर शिक्षक प्रशिक्षणार्थीच्या संपादनात कोणत्याही प्रकारचा सार्थ फरक पडत नाही

**संशोधनाची व्याप्ती**

1. प्रस्तूत संशोधनासाठी पुणे विद्यापीठातील अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय, आंबेगाव बुं।। , पुणे - 46 येथील सन 2011-12 च्या बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांशीच संबंधित आहे.
2. प्रस्तूत संशोधन जीवनकौशल्यांशी संबंधित आहे.
3. प्रस्तूत संशोधन मराठी माध्यमाच्या बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांशीच संबंधित आहे.
4. प्रस्तूत संशोधनाचे निष्कर्ष हे याच महाविद्यालयाच्या वर उल्लेखित विद्यार्थ्यांशी संबंधित लागू होतात.
5. प्रस्तूत संशोधनात स्त्री व पुरूष प्रशिक्षणार्थी दोहोंचा समावेश आहे.

**संशोधनाच्या मर्यादा**

1. प्रस्तूत संशोधन मराठी माध्यक घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांशीच संबंधित आहे.
2. प्रस्तूत संशोधनातून पारंपरिक अध्यापनाच्या तूलनेत तंत्रज्ञानाआधारे केलेल्या अध्यापनाची परिणामकारकता पडताळून पाहिली जाईल.
3. प्रस्तूत संशोधनासाठी तयार केलेल्या कार्यक्रम शालेय अभ्यासक्रमात दिलेल्या केवळ दहा जीवनकौशल्यांच्या जाणीवजागृतीसाठी तयार केलेला आहे.
4. प्रस्तूत संशोधनामध्ये शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या केवळ दहा जीवनकौशल्यांच्या संकल्पनात्मक माहिती व त्यास अनुरूप उदाहरणे आणि कृती-प्रसंगांचा विचार केला गेला आहे.

प्रस्तूत संशोधनासाठी दुस-या प्रकरणात खालील बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

**संशोधन पध्दती**

संशोधकाने संशोधनासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर केला आहे.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**संशोधन अभिकल्प -        कार्यात्मक अभिकल्प - एकलगट**

**जनसंख्या व नमुना निवड**

महाराष्ट्र शासनमान्य सर्व मराठी माध्यम शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणार्थी ही प्रस्तूत संशोधनाची जनसंख्या आहे.

- **संशोधनासाठी नमुना निवड**

संशोधकाने सन 2011-12 या शैक्षणिक वर्षात अभिनव शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी माध्यम असणा-या सर्व म्हणजेच 28 शिक्षक प्रशिक्षणार्थींची निवड केली.


**माहिती संकलनाची साधने**

प्रस्तूत संशोधनात संशोधकाने तयार केलेली संपादन कसोटी हे साधन वापरण्यात आले आहे. ही कसोटी तज्ञांच्या मार्गदर्शनाने तयार केली आहे.

**संख्याशास्त्रीय विश्लेषण व अर्थनिर्वचन**


विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या माहितीचे मध्यमान, प्रमाण विचलन , सहसंबंधगुणक, व  टी परिक्षिका या सख्याशास्त्रीय तंत्रांच्या आधारे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

**वर्गांतरानुसार पूर्व चाचणी गुण विभागणी**




*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*


**वर्गांतरानुसार उत्तर चाचणी गुणविभागणी**




- **सार्थकता स्तरावर नमुना टी चे मूल्य - टेबल नुसार**

| Pre - Test | | Post - test | | df | r | t cal. value | Observed " t " value | | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Mean** | **SD** | **Mean** | **SD** | | | | **0.05** | **0.01** | |
| 8.32 | 2.00 | 18.57 | 2.15 | 27 | 0.024 | 18.69 | **1.70** | **2.47** | **Significant** |

- **पूर्व व उत्तर चाचणीच्या मध्यमान व प्रमाण विचलनातील फरकाचा तुलनात्मक आलेख**




**अर्थनिर्वचन :**

- **0.05 सार्थकता स्तरावरील निर्णय**

0.05 सार्थकता स्तरावर स्वाधीतनता मात्रा डीएफ मूल्य हे 27 साठी संख्याशास्त्र टेबल डी नुसार टी चे नमुना मूल्य 1.70 तर प्राप्त ' टी ' चे मूल्य 18. 69 आहे.

· प्राप्त टी चे मूल्य हे नमुना टी मूल्यापेक्षा 16.99 ने जास्त आहे त्यामुळे प्राप्त टी' सार्थक मानावा लागेल.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

· म्हणजेच 0.05 सार्थकता स्तरावर प्राप्त टी मूल्य सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करून मुख्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

· बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्यात जीवनकौशल्यविषयक तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रम जाणीवजागृतीमुळे सकारात्मक असा परिणामकारक बदल झाला.

· यावरून पूर्व व उत्तर चाचणीच्या मध्यमानातील फरक सार्थ आहे असे म्हणता येईल.

- **0.01 सार्थकता स्तरावरील निर्णय**

· 0.01 सार्थकता स्तरावर स्वाधीतनता मात्रा डीएफ - 27 साठी संख्याशास्त्र टेबल डी नुसार ठी चे नमुना मूल्य 2.47 तर प्राप्त ' टी ' चे मूल्य 18.69 आहे.

· प्राप्त टी मूल्य हे नमुना टी मूल्यापेक्षा 16. 22 ने जास्त आहे त्यामुळे प्राप्त टी' सार्थक मानावा लागेल.

· म्हणजेच 0.01 सार्थकता स्तरावर प्राप्त टी मूल्य सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करून मुख्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

· बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांच्यात जीवनकौशल्यविषयक तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रम जाणीवजागृतीमुळे सकारात्मक असा परिणामकारक बदल झाला.

· 0.05 व 0.01 स्तरावर प्राप्त टी मूल्य सार्थक असल्याने बी.एड. प्रशिक्षणार्थींच्या जीवनकौशल्यविषयक जाणीवजागृतीसाठी घेण्यात आलेल्या पूर्व व उत्तर चाचणीच्या मध्यमानातील फरक सार्थ असल्याने संशोधनापूर्वी निश्चित केलेली मुख्य परिकल्पनेचा स्वीकार करून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

वरील माहितीच्या विश्लेषणावरून असे दिसून आले की, भावी शिक्षकांच्या जीवनकौशल्यविषयक जाणीवजागृतीसाठी जो तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रम निर्माण केला त्यामुळे भावी शिक्षकांच्या जीवनकौशल्यविषयक जाणीवजागृतीबाबत सकारात्मक परिणाम झालेला दिसून आला.

**निष्कर्ष**

1. भावी शिक्षकांच्या जीवनकौशल्यविषयक तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रम राबविण्यापूर्वी संकल्पना स्पश्ट नव्हती असे दिसून आले.
2. तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रम राबविण्यापूर्वी भावी शिक्षकांच्या मध्ये या संकल्पनेबाबत नकारात्मक दृश्टिकोन दिसून आला.
3. जीवनकौशल्यविशयक संकल्पनेबाबत पूर्व चाचणीत भावी शिक्षकांच्या संकल्पना अस्पश्ट होत्या तर उत्तर चाचणीत त्या संकल्पना सुस्पश्ट झाल्याच्या दिसून आल्या.
4. पूर्व चाचणीत भावी शिक्षकांनी प्रश्नांचे दिलेले नकारात्मक प्रतिसाद कार्यक्रमाच्या अंमलबजावणीने सकारात्मक झाल्याचे दिसून आले म्हणजेच तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रम यशस्वी झाला.
5. जीवनकौशल्यविशयक जाणीवजागृतीची ग्रामीण , शहरी तसेच शिक्षणाच्या सर्व स्तरांवर आवश्यकता आहे असे वाटते.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

वरील सर्व निश्कर्शांवरून प्रशिक्षणार्थ्यांना जीवनकौशल्यविशयक संकल्पनांबाबत तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रमाद्वारे माहिती व महत्व पटवून दिले व त्याचा अर्थ समजावून सांगितला तर त्यांच्यात ही जीवनकौशल्ये रूजण्यास सकारात्मक जाणीव व भावी पिढीत रूजविण्यासाठी आवश्यक अध्यापकीय दृश्टिकोन दृढ होण्यास मदत होईल.

**सर्वसाधारण निष्कर्ष**

1. व्याख्यान , अनौपचारिक चर्चा यासारख्या अभ्यासेतर कार्यक्रमातून प्रशिक्षणार्थ्यांमध्ये जीवनकौशल्यविशयक संकल्पनांबाबत जाणीवजागृती करता येउ शकते.
2. भावी शिक्षकांच्यामध्ये जाणीवजागृती करण्यासाठी तंत्रज्ञानाधारीत कार्यक्रमाद्वारे दिलेले व्याख्यान हे माध्यम प्रभावी ठरते.
3. भावी शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाबरोबरच सराव पाठांमधून जीवनकौशल्यविषयक अध्यापकीय दृष्टिकोन दिसून येतो.
4. दैनंदिन जीवनावर आधारित प्रसंगांचा समावेश असलेला तंत्रज्ञानाधारित कार्यक्रमाद्वारे भावी शिक्षकांच्या जीवनकौशल्यविषयक जाणीवांना जागृत करता येउ शकते.

**शिफारशी**

- **अध्यापक विद्या/महाविद्यालयांसाठी**

1. प्रशिक्षण विद्या/महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमामध्ये यापुढे शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट होणा-या विविध संकल्पनांचा बरोबरीनेच सहभाग होण्याचा आग्रह धरावा.
2. प्रशिक्षणार्थ्यांना भावी जीवनात जे अध्यापकीय दृष्टिकोन ठेवून अध्यापन करावयाचे आहे अशा संकल्पनांच्या प्रशिक्षण महाविद्यालयांनी प्रशिक्षकांना सतत प्रोत्साहन द्यावे. त्याबाबत तज्ञांकडून मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे.
3. प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थ्यांना वेळोवेळी शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट संकल्पनांची जाणीव करून देउन त्याविषयी सखोल माहिती व मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करावे
4. प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणादरम्यान जीवनकौशल्याधारीत अनुभव देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे.

- **शिक्षक प्रशिक्षकांसाठी शिफारशी :**

1. शैक्षणिक क्षेत्रात समाविष्ट होणा-या नवसंकल्पनांबाबत जागरूक राहून त्यांचा सखोलतेन व सातत्याने अभ्यास करावा.
2. शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट नवसंकल्पनांचा अभ्यास करून संस्थापक, महाविद्यालय प्राचार्य, सहकारी व प्रशिक्षणार्थ्यांना परिचय करून द्यावा , तसेच चर्चा करावी.
3. या नवसंकल्पनांविषयी वेळोवेळी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करावे. अध्यापकीय दृष्टिकोन विकसित करावा.
4. प्रशिक्षणार्थ्यांना सराव पाठांच्या नियोजनावेळी जीवनकौशल्यविषयक अध्यापकीय दृष्टिकोन समोर ठेवून पाठ तयारी करण्याबाबत मार्गदर्शन करावे.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

5. केलेल्या मार्गदर्शनानुसार प्रशिक्षणार्थी अध्यापन करतात की नाही याचे मूल्यमापन करावे.

- **प्रशिक्षणार्थ्यांसाठी**

1. शालेय अभ्यासक्रमातील बदलांची सातत्याने नांद घ्यावी.
2. समाविष्ट नवसंकल्पनांबाबत आपल्या शिक्षक प्रशिक्षकांशी चर्चा करावी.
3. या नवसंकल्पनांचा अभ्यास करून प्रशिक्षणात वापर करावा.
4. बदलत्या संदर्भांनुसार अध्यापकीय दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न करावा.
5. बदलत्या संदर्भांनुसार अध्यापकीय दृष्टिकोन ठेवून अध्यापनाचा सराव करावा. जीवनकौशल्ये रूजवणुकीबाबत शालेय शिक्षकांचा दृष्टिकोन अभ्यासणे व प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे सकारात्मक बदल घडविणे.

**पुढील संशोधनासाठी विषय :**

1. उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांमध्ये जीवनकौशल्यांची रूजवणूकीकरीता कार्यक्रमनिर्मिती व परिणामकारकता अभ्यासणे.
2. इयत्ता 8 वी च्या मराठी पाठयपुस्तकातील विविध जीवनकौशल्यांचा चिकित्सक अभ्यास.
3. जीवनकौशल्य रूजवणुकीबाबत शालेय शिक्षकांचा दृष्टिकोन अभ्यासणे व प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे सकारात्मक बदल घडविणे.
4. एम. एड. प्रशिक्षणार्थ्यांच्या जीवनकौशल्यविषयक संकल्पना जाणीवजागृतीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाची निर्मिती व परिणामकारकतेचा अभ्यास.

**संदर्भ सूची : पुस्तकेः**

- **( इंग्रजी)**

*Best, J.W. & Khan,J.V. " (2009), "Researches in Education", (10th ed.) New Delhi, Prentice Hall of India Pvt. Ltd.*

*Bandura, A. ( 1977), "Social Learning Theory", Englewood Cliffs., Prentice Hall of India Pvt. Ltd.*

*Kothari,C.R., (2004), "Research Methodology : Methods and Techniques" ,(2nd ed.) , New Delhi, New Age International Pvt. Ltd. Publishers - 15*

*Meena, (2010), "The Need for Life Centered Education Via Life skills Paradigm", New Delhi, University News-Vol.- 48 (17)*

*N.C.E.R.T., (2000), "A Gudide to Family Health and Life skills Education for Teacher"s & Student"s, New Delhi.*

*Prabhudesai, S.R.,(1995),"Navneet Advanced Dictionary", Mumbai, Navneet Publication. Pvt. Ltd.*

- **(मराठी)**

*घोरमोडे के. यु. , व घोरमोडे कला, (2008), ''शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे'', नागपूर, विद्या प्रकाशन.*

*जगताप ह. ना., (2004), प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान, (चौथी आवृत्ती), पूणे, नूतन प्रकाशन.*

*भिंताडे वि. रा., (मार्च. 2009), ''शैक्षणिक संशोधन पध्दती'', पूणे, नूतन प्रकाशन.*

*मुळे रा.श., उमाटे वि.तु.,(ऑक्टो. 1998), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे,पूणे :महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

- **पाठयपुस्तके :**

*कुमारभारती मराठी, इयत्ता नववी, व्यक्तिमत्त्व विकास, (मे 2008), महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.*

*बालभारती मराठी, इयत्ता सातवी, ( मे 2008), महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - 04.*

*बालभारती मराठी, इयत्ता आठवी, ( जाने. 2009), महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे .*

- **शिक्षक मार्गदर्शिका :**

*महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ''जीवनकौशल्ये शिक्षण, शिक्षक मार्गदर्शिका भाग एक व दोन'',(2011, जून), पुणे,युनिसेफ.*

*महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिशद,'' सातत्यपूर्ण सर्वंकश मूल्यमापन '' , (2010, सप्टे.), पुणे,*

- **शैक्षणिक मासिके : -**

*पाटील व्ही.एन व चटटे आर.व्ही.,(ऑक्टो. 2009),''जीवन कौशल्यांसाठीचे शिक्षण'',शिक्षण समीक्षा. 122-125*

*पाटील शोभा,(ऑक्टो. 2009),''जीवनकौशल्ये यशस्वी जीवन जगण्याची कला'', शिक्षणातील संक्रमण.29-31.*

*साळी व.झा.,(2010, डिसें.),''जीवनकेंद्री शिक्षणासाठी जीवनकौशल्ये शिक्षण'', शिक्षण तरंग.*